
रूप पालटू
शिक्षणाचे

# रूप पालटू शिक्षणाचे

## (भाग – १)

❋ ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक भूमिका ❋

❋ नमुना उपक्रमांची रूपरेषा ❋

शैक्षेणक उपक्रम संशोधिका – प्रकाशन पाचवे

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३०.

**रूप पालटू शिक्षणाचे (भाग– १)**

✻ **प्रकाशक**
वि.शं./सुभाष देशपांडे
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

✻ **मुद्रक**
ज्ञान प्रबोधिनी
मुद्रण विभाग, पुणे

✻ **मुखपृष्ठ**
श्री. गिरीश सहस्रबुद्धे

✻ **अक्षर जुळणी**
**छात्र प्रबोधन, पुणे**

✻ **स्वामित्व**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३०.

✻ **मूल्य**
रुपये ३०/-

✻ **प्रथम आवृत्ती**
भारतीय सौर श्रावण २८, शके १९२२
१९ ऑगस्ट २०००

# अनुक्रमणिका


* प्रकाशकाचे दोन शब्द........................१
* ज्ञान प्रबोधिनी: शैक्षणिक उपक्रम भूमिका....२
* शैक्षणिक उपक्रमांची रूपरेषा

  नमुना उपक्रम

  १. सहाध्यायदिन........................२०
  २. क्रीडामहोत्सव........................२७
  ३. गुणविकास योजना..................३३
  ४. अभिव्यक्ती विकास..................४१
  ५. साखरशाळा प्रकल्पात................५१
  विद्यार्थ्यांचा सहभाग

# प्रकाशकाचे दोन शब्द

'मनुष्यघडणीसाठी शिक्षण' ही स्वामी विवेकानंदांची मध्यवर्ती कल्पना आजच्या काळात प्रत्यक्षात उतरविण्याचा ज्ञान प्रबोधिनी प्रयत्न करीत असते. औपचारिक शिक्षणासाठी उभ्या केलेल्या शाळांना कशाकशाची जोड दिली पाहिजे; अध्यापक, पालक आणि समाज यांनी शैक्षणिक प्रक्रियेमध्ये कोणत्या भूमिका बजावण्याची गरज आहे याचा उहापेह करणारे व त्यातील नमुना उपक्रमांची रूपरेषा समोर मांडणारे हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

राष्ट घडणीची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात जागवायची असेल, तर शिक्षण प्रक्रियेत व आशयात कोणते परिवर्तन झाले पाहिजे, याविषयी प्रबोधिनीची भूमिका स्पष्ट करणारे विस्तृत विवेचन प्रबोधिनीचे संचालक वाचस्पती मा. गिरीशराव बापट यांनी पुस्तकाच्या प्रारंभी केले आहे. विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि आत्मिक विकास म्हणजे काय, तो कसा करता येईल, त्याचे पर्यवसान प्रेरणासंपन्न, राष्टाभिमुख व समृद्ध व्यक्तिमत्त्वात कसे होऊ शकेल, याची मांडणी प्रबोधिनीच्या गेल्या ३० वर्षांच्या अनुभवांच्या आधारे यात केली आहे.

ही शैक्षणिक प्रक्रिया अनेक शाळांनी अनुसरली पाहिजे, असा प्रबोधिनीचा आग्रह असतो. त्यासाठी विविध संस्थाचालक, मुख्याध्यापक, अध्यापक व विद्यार्थी यांची प्रशिक्षण शिबिरे प्रबोधिनीच्या केंद्रांवर चालू असतात. त्या शैक्षणिक पर्यावरणात, शासकीय व्यवस्थेला अथवा स्पर्धोन्मुख समाजाला नावे ठेवण्यात वेळ दवडण्यापेक्षा वेगळे काही प्रत्यक्ष करून कसे दाखविता येईल, याबद्दल नेमकी रूपरेषा या पुस्तकात मांडली आहे. सुमारे ५ वर्षांत ही प्रक्रिया टप्याटप्याने आपापल्या शाळांमध्ये कशी आत्मसात करता येईल, याचे दिग्दर्शन एका आराखड्याद्वारे केले आहे. पाच पायऱ्यांमधील एकेक नमुन्याचा उपक्रम निवडून त्याची कार्यवाही कशी करावयाची, याचे तपशीलवार विवेचन उत्तरार्धात केले आहे. या उपक्रमांना अन्यत्र आवृत्ती करता येईल इत या दर्जापर्यंत नेऊन ठेवण्यास आजवरच्या अनेक अध्यापकांनी वेळोवेळी योगदान केले आहे. त्यातील काहींनी आपल्या अनुभवाद्वारे हे चिंतन या पुस्तकासाठी लेखबद्ध केले आहे. या सर्वांना प्रबोधिनीच्या वतीने धन्यवाद !

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै.वि.वि. तथा आप्पासाहेब पेंडसे यांच्या सतराव्या स्मृतिदिनी हे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांनी निर्माण केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण व वर्धिष्णू कार्यरचनेचे हे एक पुढचे पाऊल ठरेल, असा वि  ास वाटतो.

**राष्टीय सौर २८ श्रावण, शके १९२२** — **वि.शं./सुभाष देशपांडे**
**१९ ऑगस्ट २०००.** — **कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी**

# ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

१. **व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत** रु. ६०
(सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी)

२. **नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ?** रु. ५०
(प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

३. **प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** रु. ५०
(ललित लेखन कसे करावे याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

४. **कल्पक बनू या** रु. ६०
(कल्पनाशक्ती वाढविण्याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक)

५. **वेध यशाचा** रु. ७०
(स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यासाठी उपयुक्त तंत्रे)

६. **असे घटते सुंदर अक्षर** रु. १०
(हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका)

७. **हसत खेळत बुद्धिविकास** रु. १००
(बुद्धिच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ)

८. **बुद्धीवैभव** रु. २०
(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

९. **प्रज्ञाबोध मालिका-५ पुस्तकांचा संच** रु. २००
(राष्ट्रीयं प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उपयुक्त-दोन्ही माध्यमांमध्ये)

१०. **छंद आकाशदर्शनाचा** रु. ६०
(आकाशातील नक्षत्रे-ताऱ्यांचा परिचय)

११. **गिर्यारोहणगाथा** रु. ४०
(गिर्यारोहणाची प्राथमिक माहिती व प्रेरणा देणारे पुस्तक)

१२. **प्रबोधन गीते-भाग२ ध्वनिफीत** रु. ४०
(ज्ञान प्रबोधिनीतील स्फूर्तीगीते)

**ज्ञान प्रबोधिनीची इतरही अनेक संग्राह्य प्रकाशने उपलब्ध !**

<u>नियतकालिके</u>-

१. **छात्र प्रबोधन** वार्षिक वर्गणी रु. १२५
(कुमारांसाठीचे अभिनव मासिक)

२. **प्रशिक्षक** वार्षिक वर्गणी रु. ४०
(शिक्षकांसाठी द्वैमासिक)

**संपर्क पत्ता :**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, ☎ (०२०)४४७७६९१,४४७८०९५**

मनुष्यघडणीच्या शिक्षणासाठी अनुकूल वातावरण निर्माण करायचे असेल तर शाळेतील रूढ शैक्षणिक भूमिका बदलायला लागतील. शाळेबाहेरील सामाजिक पर्यावरणाच्या विरोधी असा हा बदल असल्यामुळे तो करण्यातही अडचणी येतील. पण अध्यापक, मुख्याध्यापक, संस्थाचालक हे तीन्ही एकवटले तर विद्यार्थ्यांच्या औपचारिक शिक्षणात चांगले बदल दिसायला लागतील. अशी इच्छा असणाऱ्यांना प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोगांतून व उपक्रमांतून स्वत: काय करता येईल हे सुचू शकेल. हे उपक्रम सर्वांना जसेच्या तसे राबवता येतीलच असे नाही.ज्यांना ज्यांना समाजात काही नवे वळण पाडावे असे वाटते त्यांनी प्रथम तसा विचार व प्रयत्न करण्याचा आपल्याला निसर्गदत्त अधिकार आहे हे ओळखावे. मग प्रबोधिनीतील शैक्षणिक उपक्रमांच्या विस्तारामागचा प्रेरणा-स्रोत त्यांना सापडेल. तो सापडला तर मग उपक्रमांचा विस्तार प्रत्येकाला स्वतंत्रपणे करता येतो. इतरांचे प्रयोग आधारासाठी व संदर्भासाठी घ्यायचे असतात.

अशा आधारासाठी व संदर्भासाठीच या पुस्तकाची निर्मिती !